30 MAR 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी घडामोडींचा विश्लेषणात्मक अभ्यास करावा

## खा. महाडिक : विद्यापीठात राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
समाजाच्या तळागाळातील घटकांच्या समस्यांची जाणीव असणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना असे प्रश्न समजून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असते. तसेच या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी वस्तुनिष्ठ माहिती मिळवून संसदेत पाठपुरावा करावा लागतो. विद्यार्थ्यांना जर स्वतःला देशपातळीवर सिद्ध करायचे असेल, तर त्यांनी समाजातील प्रत्येक घडामोडीचा विश्लेषणात्मक अभ्यास करून, त्याचा तपशील समजावून घ्यावा, असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडिक यांनी केले. शिवाजी विद्यापीठात गुरुवारी झालेल्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत ते बोलत होते.

केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत देशातील विविध विद्यापीठांमध्ये १४ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा शिवाजी विद्यापीठात घेण्यात आली. विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतून एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. खासदार धनंजय महाडिक, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, मिनिस्ट्री ऑफ पार्लमेंटचे राजन, एमआयटीचे प्रोफेसर सुधीर गव्हाणे, डॉ. प्रल्हाद माने यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले.

खासदार धनंजय महाडिक यांनी, संसदीय कामकाजाविषयी माहिती दिली. एखादा प्रश्न मांडत असताना, त्याबाबत सखोल आणि तंतोतंत माहिती आपल्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. आपण उपस्थित केलेल्या प्रश्नावर टीका करणाऱ्यांनादेखील या प्रश्नांचे गांभीर्य पटवून सांगता येणे महत्त्वाचे आहे. संसदेची कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी लोकसभेचे कामकाज अभ्यासणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील समस्या मांडण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला. तोंडी तलाकबंदी, सर्जिकल स्ट्राईक, आतंकवाद, गोवंश हत्याबंदी, शेतकरी आत्महत्या, नोटाबंदी, जीएसटी, हिंदी प्रचार आणि प्रसार, मानवी तस्करी, कुपोषण, नोकर भरती, बँक भ्रष्टाचार, नीरव मोदी, विजय मल्ल्या, भीमा-कोरेगाव या घटनांबाबत अभ्यासात्मक चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी घटनेची सखोल आणि विश्लेषणात्मक मांडणी करून पुढील वाटचालीत आपले स्थान मजबूत केले आहे, असे उद्गार खासदार महाडिक यांनी काढले. या स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट मांडणी केल्याबद्दल निकिता पिसे, अभिजित ताम्हणकर, विनायक साळुंखे, गौरी काटे, आकांक्षा पाटील, श्रेयस मोहिते यांना गौरविण्यात आले. एस. एस. सुहार, आर. एस. पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

30 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी विश्लेषणात्मक अभ्यास करावा

## खासदार महाडिक : शिवाजी विद्यापीठात युवा सांसद स्पर्धा

कोल्हापूर, ता. २९ : 'देशपातळीवर स्वतःला सिद्ध करायचं असेल, तर विद्यार्थ्यांनी समाजातील प्रत्येक घडामोडीचा विश्लेषणात्मक अभ्यास करावा,' असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडिक यांनी आज येथे केले.

केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे शिवाजी विद्यापीठात आयोजित १४ व्या राष्ट्रीय युवा सांसद स्पर्धेत ते बोलत होते. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतून एकूण ५५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

श्री. महाडिक म्हणाले, "प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी वस्तुनिष्ठ माहिती मिळवून संसदेत पाठपुरावा करावा लागतो. त्याचबरोबर आपण उपस्थित केलेल्या प्रश्नावर टीका करणाऱ्यांनादेखील या प्रश्नांचं गांभीर्य पटवून सांगता येणं महत्त्वाचं आहे. संसदेची कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी लोकसभेचं कामकाज अभ्यासणं महत्त्वाचं आहे."

तोंडी तलाकबंदी, सर्जिकल स्ट्राईक, आतंकवाद, गोवंश हत्याबंदी, शेतकरी आत्महत्या, नोटाबंदी, जीएसटी, हिंदी प्रचार आणि प्रसार, मानवी तस्करी, कुपोषण, नोकर भरती, बँक भ्रष्टाचार, नीरव मोदी, विजय मल्ल्या, भीमा कोरेगाव या घटनेबाबत अभ्यासात्मक चर्चा झाली. स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट मांडणी केल्याबद्दल निकिता पिसे, अभिजित ताम्हणकर, विनायक साळुंखे, गौरी काटे, आकांक्षा पाटील, श्रेयस मोहिते यांना गौरवण्यात आले.

या प्रसंगी प्र-कुलगुरु डी. टी. शिर्के, मिनिस्ट्री ऑफ पार्लमेंटचे श्री. राजन, एम.आय.टी.चे प्रोफेसर सुधीर गव्हाणे, डॉ. प्रल्हाद माने, एस. एस. सुहार, आर. एस. पाटील उपस्थित होते.

30 MAR 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यक्ती जन्माने नव्हे, कर्तृत्वाने श्रेष्ठ ठरते

## प्राचार्य हेरवाडे : महावीर अध्यासन केंद्र, महावीर कॉलेजतर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, २९ : भगवान महावीरांनी अहिंसा अपरिग्रह, अनेकांतवाद ही जगाला दिलेली देणगी आहे. महावीरांचे विचार आचरणात आणले तर सामाजिक आरोग्य बिघडणार नाही. माणसाचा मेंदू आणि मन स्थिर झाल्यास जगात शांतता निर्माण होऊ शकते, असा महान विचार महावीरांनी आचारणात आणला व ते महावीर झाले. स्वत:च्या कर्तृत्वाने जगाला शांतीचा संदेश देऊन ते अहिंसावीर ठरले. म्हणूनच कोणतीही व्यक्ती जन्माने नव्हे तर कर्तृत्वाने श्रेष्ठ होते, असे मत प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : महावीर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना प्राचार्य श्रीधर हेरवाडे. शेजारी डॉ. लक्ष्मीसेन भटटारक महाराज, महावीर देसाई, डॉ. आर.पी. लोखंडे व अन्य मान्यवर.**

महावीर जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या महावीर अध्यासन केंद्र व महावीर महाविद्यालय यांच्यातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. संस्थेचे कार्यवाह महावीर देसाई अध्यक्षस्थानी होते. स्वस्तिश्री डॉ. लक्ष्मीसेन भट्टारक महाराज, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. सुषमा रोटे, श्री. गुणवंत रोटे, डॉ. धनंजय गुंडे प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्य हेरवाडे म्हणाले, अंतरंगातील परिग्रहावर विजय मिळविण्याचा प्रयत्न करा व दुसऱ्याच्या विचारांचा आदर करायला शिका हा विचार महावीरांनी जगाला दिला.

श्री देसाई म्हणाले, ''महावीरांनी पंचानुव्रते सांगितली. यातील सत्य आणि अहिंसा या मार्गाने गांधीजींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.'' स्वस्तिश्री डॉ. लक्ष्मीसेन भट्टारक महाराज यांचे मंगल प्रवचन झाले. भगवान महावीर अध्यासनचे प्रमुख डॉ. व्ही. बी. ककडे यांनी भगवान महावीर अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली.

अमृता पेडणेकर हिच्या मंगलाचरण गायनाने सुरुवात झाली. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी केले. राजेंद्र हिरकुडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी केले. या वेळी प्रा. जयवंत दळवी, समन्वयक डॉ. मलगोंडा मायगोंडा, डॉ. शैलजा मंडले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
30 MAR 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुंतवणूकदारांसाठी आर्थिक साक्षरता आवश्यक


**विद्यापीठातील व्याख्यानात प्रत्युष भास्कर यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धात्मक बाजार व आधुनिक तंत्रज्ञान यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये झपाट्याने बदल घडून येत आहेत. देशाच्या आर्थिक प्रगतीचा दर व जागतिक बदल यांचा शेअर बाजारावर मोठ्या प्रमाणात चढ-उतार घडून येतात. त्यामुळे गुंतवणूकदारांची 'आर्थिक साक्षरता' हाच त्यांच्या साधनसंपत्तीचा आधार असणार आहे, असे प्रतिपादन शेअर बाजाराचे तज्ज्ञ प्रत्युष भास्कर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, कार्यक्रमाचे संयोजक प्रा.डॉ.एम. एस.देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. भास्कर यांनी शेअर बाजाराचे स्वरुप, कार्ये व कार्यप्रणाली याबद्दल सविस्तर माहिती दिली. शिवाय राष्ट्रीय शेअर बाजारामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमाची ओळख करून दिली. या अभ्यासक्रमातून आत्तापर्यंत जवळपास २० लाख तरुणांना रोजगार प्राप्त झाला आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाचा लाभ घावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक संयोजक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. स्वागत अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले.

…नसंपर्क कक्ष
…वाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2018
सकाळ



कोल्हापूर : 'ग्रीन इकॉनॉमी : इंडिया व्हेयर स्टँड इन द वर्ल्ड' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ समाज सुधारक व कार्यकर्ते आनंदराव पाटिल, डॉ. रमेश कोलवलकर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. प्रकाश पवार आदी.

# डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. विशाल ओव्हाळ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रा. डॉ. विशाल ओव्हाळ लिखित 'ग्रीन इकॉनॉमी : इंडिया व्हेयर स्टँड इन द वर्ल्ड' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ कार्यकर्ते आनंदराव पाटील, डॉ. रमेश कोलवलकर, विद्यापीठाचे वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, स्कूलचे प्रभारी संचालक व राज्यशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले. डॉ. संतोष सुतार, डॉ. वड्राळे व डॉ. मोनाली खाचणे या उपस्थित होत्या. या पुस्तकामध्ये भारत देश विकसित व विकसनशील देशांच्या तुलनेत प्रदूषणविरहित विकासवृद्धी साध्य करण्यात कितपत यशस्वी झाला आहे, याची मांडणी करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2018
तरुण भारत



**कोल्हापूर :** कुलगुरू देवानंद शिंदे यांच्याकडून नियुक्तीचे पत्र घेताना अनिल चौगुले.

# पर्यावरण अभ्यासक अनिल चौगुले यांची सिनेटवर निवड

**कोल्हापूर :** पर्यावरण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि निसर्ग मित्र संस्थेचे सचिव अनिल चौगुले यांची शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर निवड करण्यात आली. ही नियुक्ती राज्यपालांनी केली असून याबाबतचे पत्र कुलगुरू देवानंद शिंदे यांनी गुरुवारी चौगुले यांना दिले. चौगुले गेली २५ वर्षे निसर्ग मित्रच्यावतीने विविध पर्यावरणपुरक उपक्रमांचे आयोजन करण्याबरोबरच वृक्ष प्राधिकरण, जैवविविधता मंडळ, जिल्हा पर्यावरण समिती यांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. निर्माल्य आणि गणेश मूर्ती दान, बी संकलन, नैसर्गिक रंग दिलेल्या गणेश मूर्ती, रानभाज्यांचा प्रसार हे कार्य करत आहेत. तसेच देवराई संवर्धन, नैसर्गिक खत निर्मिती, सौर उर्जा यांच्या प्रचार प्रसारासाठी विविध उपक्रम राबवतात. पर्यावरणपुरक कामात त्यांचे मोलाचे योगदान आहे. वृक्षतोड, प्रदूषण, खाणकाम विरोधी लढ्यात त्यांचा सहभाग आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठात १४ वी राष्ट्रीय युवा संसद

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत देशातील विविध विद्यापीठांमध्ये १४ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा पार पडली. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील एकूण ५५ विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेतला. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांची मांडणी केली. तोंडी तलाकबंदी, सर्जिकल स्ट्राईक, दहशतवाद, गोवंश हत्याबंदी, शेतकरी आत्महत्या, नोटाबंदी, जीएसटी आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी मते मांडली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मिनिस्ट्री ऑफ पार्लमेंटचे राजन, प्रा. सुधीर गव्हाने, डॉ. प्रल्हाद मान उपस्थित होते.